You Tube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ वे | अंक २१ | सोमवार, दि. १६ मे २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य २ /- रूपये

## रेल्वे विभागाविरोधात नागरिकांचा आक्रोश
# हजारो नागरिक रेल्वे रुळावर

**भद्रावती / प्रतिनिधी**
रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण केलेल्या माजरी येथील नागरिकांना अनेक वर्षानंतर अचानक रेल्वे विभागाने घरे खाली करण्यासंदर्भात नोटीस दिल्या होत्या, घर खाली करण्यासाठी रेल्वे विभाग व वेकोली नागरिकांवर दबाव टाकू पाहत होते, १४ मे पर्यंत घरे खाली करा अन्यथा रेल्वे प्रशासनाकडून घरे पाडण्यात येणार असा इशारा नागरिकांना देण्यात आला होता. मागील अनेक वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली, घरे पडल्यास पुढे काय करावं हे सुचेना म्हणून आता सर्वांनी एकत्र यावे यासाठी तब्बल दीड हजार नागरिक रेल्वे रुळावर येऊन आंदोलन करू लागले. रेल्वे विभाग व वेकोलीच्या विरोधात नारेबाजी सुरू झाली.



बघता बघता नागरिकांची संख्या वाढू लागली, हजारो नागरिकांनी शहराचे भ्रमण करीत आता अन्याय सहन करणार नाही अशी भावना मनात ठेवत मोर्चात सहभाग घेतला.
नागरिकांचा आक्रोश बघता सामाजिक संघटना व व्यापारी संघटना सुद्धा आंदोलनात सहभागी झाले. मोर्चात संतप्तमहिला नागरीक युवकासह अबालवृद्ध हजारोच्या संख्येने सहभागी होऊन रेल्वे प्रशासन व वेकोलि प्रशासन यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. शेवटी मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. दरम्यान माजी जी.प. सदस्य प्रवीण सुर संघर्ष समितीचे राजेश रेवते, व्यापारी संघटनेचे उल्हास रत्नपारखी, भारतीय मुस्लिम परिषदचे अशरफ खान माजरी सरपंच छाया जंगम माजी सरपंच श्रीकृष्ण वनकर सामाजिक कार्यकर्ते रवि राय यांनी रेल्वे प्रशासना विरुद्ध हा लढा असून पीडित नागरिकांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरुच राहणार असे सांगितले. या जनआंदोलनाला आता माजरीतील विविध राजकीय पक्षांनी व सामाजिक संगटनेनी पूर्ण ताकदीने समर्थन दिले आहे. सदर जनआंदोलन उग्र रूप धारण करतील अशी आशंका व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे रेल्वेच्या कारवाई दरम्यान आरपीएफचे जवान व नागरिक आमने सामने येण्याची शक्यता आहे. माजरीतील नागरिकांचा आक्रोश वाढल्यास याला रेल्वे, वेकोली आणि राज्य सरकार जवाबदार असनार असे प्रविण सूर यांनी म्हटले आहे आणि तसे निवेदन ही दिले आहे. माजरी संघर्ष समिती ने जिल्हाधिकारी ला माजरी पोलीस स्टेशन च्या माध्यमातून निवेदन देऊन एक ही घर तोडू नये असे निवेदन दिले आहे.

## राज्यमंत्री बच्चु कडू चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**चंद्रपूर** : राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, कामगार राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मंगळवार, दि. १७ मे २०२२ रोजी रात्री ९ वाजता शासकीय विश्रामगृह, राजुरा येथे आगमन व राखीव. रात्री ९.१५ वाजता पाटण ता. जिवती येथील कोलाम गुड्याकडे प्रस्थान. रात्री ९:३० वाजता पाटण ता. जिवती येथील कोलाम गुड्यावर आगमन व आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती, भोजन व मुक्काम. बुधवार, दि. १८ मे २०२२ रोजी सकाळी ८ वाजता पाटण ता. जिवती येथील कोलाम गुड्यावर कोलामांशी समस्यांवर चर्चा. सकाळी ९ वाजता गडचिरोलीकडे प्रयाण. दुपारी ३:३० वाजता चंद्रपूर येथे कामगारांचा आनंद मेळावा. सायंकाळी ६:३० वाजता नागपूरकडे प्रयाण.

## भरधाव अज्ञात ट्रकने दोन म्हसींना चिरडले
### एका म्हसीचा जागीच मृत्यू तर दुसरी गंभीर जखमी माथरा-गोवरी मार्गावरील घटना



**राजुरा / प्रतिनिधी**
घराकडे म्हशींचा कळप येत असताना भरधाव ट्रकने दोन म्हशींना जबर धडक दिली.यात एका म्हसीचा जागीच मृत्यू झाला तर दुसरी गंभीर जखमी झाली. राजुरा तालुक्यातील माथरा येथील शेतकरी रामदास सीताराम चहारे यांच्या मालकीच्या एका म्हसीचा जागीच मृत्यू झाला तर तुकाराम सीताराम चहारे यांची म्हस गंभीररीत्या जखमी झाली. यात दोनही भावांच्या म्हसींचे मोठे नुकसान झाले आहे.ही घटना शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास माथरा-गोवरी मार्गावर घडली.
राजुरा गोवरी मार्गावर सकाळच्या सुमारास भरधाव ट्रकने दोन बैलांना धडक दिल्यानंतर त्याच दिवशी रात्री ९ वाजताच्या सुमारास गोवरीकडे जाणाऱ्या अज्ञात ट्रकने दोन म्हसींना जबर धडक दिली.यात एका म्हसीचा जागीच मृत्यू झाला तर दुसरी गंभीररित्या जखमी झाल्याने शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे.
दोन्ही दुभती महागडी जनावरे असल्याने दूध विकून शेतकरी संसाराचा गाडा चालवीत होते.मात्र अचानक दुभत्या जनावरांचा अपघात झाल्याने शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे.

## आज वरोऱ्यात जाहीर व्याख्यान, भव्य सत्कार आणि बुद्ध- भीम गीत गायन स्पर्धा
### ॲड. वैशाली डोळस उपस्थित राहणार

**वरोरा / प्रतिनिधी**
बुद्ध पौर्णिमा आणि महाकवी वामनदादा कर्डक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाकवी वामनदादा कर्डक कृती समिती वरोऱ्याच्या वतीने जाहीर व्याख्यान मान्यवरांचा भव्य सत्कार तसेच बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धेचे आयोजन १६ मे रोज सोमवारला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक वरोरा येथे दु, ४:०० ते सायं १० वाजेपर्यन्त करण्यात आले आहे,
भीम गीत गायन स्पर्धा दु.४:०० ते सायं६:०० वाजेपर्यन्त या सत्राचे उदघाटन .सुशील देवगडे(नगरसेवक ,न. प भद्रावती)यांच्या हस्ते करण्यात येणार असून या स्पर्धेत १० वर्षावरील सर्वच स्पर्धक भाग घेऊ शकतात.व सहभागी सर्वच स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
दुसरे सत्र जाहीर व्याख्यान व आंबेडकरी चळवळीतील जेष्ठांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे, वेळ सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत व्याख्यानाचा विषय- बहुजन समाजाचा मुक्तीपथाचा मार्ग आणि आव्हाने हा असून सदर सत्राच्या स्वागताध्यक्षा .शोभा वेले ,(जेष्ठ कवयित्री नागपूर)कार्यक्रमाच्या अध्यक्षा. ,ॲड, वैशाली डोळस (परिवर्तनवादी विचारवंत, औरंगाबाद) तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. जावेद पाशा (फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे गाढे अभ्यासक, नागपूर) उपस्थित राहणार आहेत, तसेच आंबेडकरी चळवळीतील काम करणारे जेष्ठ मान्यवर केशवराव ठमके,. विठ्ठल उर्फ नेताजी बुरचुंडे, ॲड मनोहर पाटील यांचा समाजाच्या व मान्यवरांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात येणार आहे.



तरी या कार्येक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वामनदादा कर्डक कृती समितीचे वरोराचे अयोजक दशरथ शेंडे,(अध्यक्ष) सुनील शिरसाट,(सचिव) पदाधिकारी -शिलास पुनवटकर, अमर गोंडाने ,हितेश राजनहिरे, चंदन करमरकर, संजय गायकवाड, विश्वदीप गोंडाने, निशांत पाटील, , हितेंद्र तेलंग,प्रेम मुंजनकर ,अहेफाज शेख तसेच सरला ठमके, वंदना मून, मेघा भालेराव, प्रतिभा कुंभारे, पुष्पा साठे,पुष्पा पाटील, उषा मून, जोत्स्ना खोब्रागडे यांनी केले आहे,




वाढते उन्हा मुळे दुपारच्या सुमारास चंद्रपुरातील रस्ते निर्मनुष्य होत आहेत वरोरा नाका चौकातील असेच बोलके दृश्य

**१५ मे रोजी उष्णतेचा पारा ४६.८**

## मध्यरात्री खंडीत झालेला वीज पुरवठा वीजकर्मचाऱ्यांनी केला पूर्ववत
### महावितरणच्या अभियंता व कर्मचारी यांच्या शर्थीच्या प्रयत्नास यश

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
महावितरणच्या बाबूपेठ ३३ केव्ही. उपकेंद्राला विजपुरवठा करणारी सिकॉम मुख्य ३३ केव्ही लाईन अतिभारीत होऊन त्याला शास्त्रीनगर जवळ रेल्वे लाईन क्रॉसिंग जवळ रात्री २.१५ वाजता जळून जाऊन मोठे छिद्र पडले, परिणामी बाबुपेठला उपकेंद्राला होणारा विजपुरवठा खंडित झाला. बाबूपेठ उपकेंद्रावर अवलंबून असणाऱ्या ग्राहकांना विजेपासून वंचित होण्यापासून वाचविण्यासाठी पठानपुरा उपकेंद्राच्या व्ही. के.२ वाहीनीवर विजपूरवठा रात्री २.३० वाजता वळविण्यात आला, परंतु आधीच अतिभारीत यंत्रणा त्यावर





वाळविलेला भार (३२० अंपीअर च्या वर) सहन न करून शकल्याने पठानपुरा व्ही. के. २ वाहिनी चा जंपरही तापल्या मुळे रात्री ०२:३० वाजता वितळून तुटला. त्यामुळं बाबुपेठ आणि पठानपुरा असा दोनही उपकेंद्रांचा विजपुरवठा खंडित झाला. रात्रभर दुरुस्ती काम करून,पहाटे ५ वाजता जेव्हा व्ही. के. २ वाहिनी चे जंपर जोडून दोन्ही उपकेंद्र भारीत (चार्ज)करण्यात आले तेव्हा पठानपुरा उपकेंद्राचा विजपुरवठा सुरळीत झाला परंतु,बाबुपेठ उपकेंद्रावर वर भार जास्त असल्याने, ट्रिप झाले.
शेवटी बाबुपेठ उपकेंद्रावरून समाधी उपकेंद्राला होणारा विजपूरवठ्याचा भार कमी करण्यास समाधी उपकेंद्राचा काही भार सकाळी ०५:४० वाजता नवीन समाधी उपकेंद्रावर वळविण्यात आला आला.
मुख्य अभियंता सुनील देशपांडे, अधीक्षक अभियंता श्रीमती संध्या चिवंडे व कार्यकारी अभियंता उदय फारसखानेवाला यांनी लक्ष ठेवून अभियंत्याना मार्गदर्शन केले.
रात्रभर, चंद्रपूर उपविभाग १ चे उपकार्यकारी अभियंता वसंत हेडाऊ, सहा. अभियंता साहिल टाके, सहा. अभियंता टिकेश राऊत,सहा. अभियंता, अभियंता सुमेध खणके, सहा. अभियंता मिथुन मेश्राम व ठेकेदार रवीभाऊ कातकर यांनी रात्रभर केलेल्या मशाकती मुळे शेवटी सकाळी ६ वाजता बाबुपेठ, भिवापूर वॉर्ड, लालपेठ, महाकाली वॉर्ड, पठानपुरा आदी ठिकाणचा विजपुरवठा पुर्ववत झाला.

## पत्नीच्या वियोगात युवकाची विहिरीत उडी घेवुन आत्महत्या

**चिमूर / प्रतिनिधी**
तालुक्यातील तळोधी(ना.) येथील ४० वर्षीय विवाहित युवकाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास उजेडात आली. तळोधी (ना.) येथील रहिवासी गोविंदा सदाशिव धानोरकर या विवाहित तरुणाने रविवारला दुपारी एक वाजताच्या सुमारास सायकल ने जाऊन, सायकल बाजुला फेकुन देऊन गावाशेजारी असलेल्या श्रीराम शेंडे यांच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार घटनेच्या जवळच असलेल्या तेंदूपत्ता संकलनाचे काम करीत असलेल्या नागरिकांच्या समोर घडल्याने नागरिकांनी विहिरीकडे धाव घेऊन गोविंदाला बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत गोविंदाचा मृत्यु झाला होता. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. लागलीच भीष्मराज सोरते, पो कां शंकर बोरसरे यांनी घटनास्थळावर पंचनामा करून प्रेत शवविच्छेदन करीता उप-जिल्हा रुग्णालय, चिमूर येथे पाठविले. पुढील तपास ठाणेदार मनोज गभणे यांचे मार्गदर्शनात सुरू आहे.गोविंदाचे १२ वर्षांपूर्वी लग्न झाले होते. मात्र, त्यांना कोणत्याही प्रकारचे अपत्य झाले नाही. पंधरा दिवसांपुर्वी पत्नी नातलगाच्या लग्नास जात असल्याचे सांगुन आठ दिवसांपूर्वी भ्रमणध्वनीवर मी नागपुरला दुसऱ्या सोबत लग्न केले असल्याचे सांगितले. यामुळे आपली बदनामी होईल या नैराश्यातुन गोविंदाने आत्महत्या केली असल्याचे बोलले जात आहे.



# भाजपा शेतकऱ्यांच्या पूर्णपणे पाठीशी : जिल्हाध्यक्ष भोंगळे

### भाजपातर्फे ताडाळी-घुग्गुस रेल्वेलाईनवर रेल्वे रोको आंदोलन



- यापसंगी बोलताना भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले, की या ताडाळी ते घुग्घुस रेल्वे मार्गाला लागूनचं साखरवाही परिसरातील शेत्या असल्याने रेल्वे मार्गावरून शेतकऱ्यांना ये-जा करण्याकरिता अंडरपास (बोगदा) किंवा रेल्वे फाटक करून देण्यासंदर्भात महामंत्री नामदेव डाहूले यांनी गेल्या दोन वर्षांपासून पत्रव्यवहार केला. परंतू रेल्वे प्रशासनाने याकडे वारंवार दुर्लक्ष केले. त्यामुळे गेल्या ११ मे रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत हा विषय लावून धरल्या गेला. यावेळी रेल्वेने स्पष्ट भूमिका न कळविल्याने आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज हे आंदोलन पार पडले.
- पुढे बोलताना, याआधी जाण्यायेण्यासाठी याठिकाणी रस्ता होता, परंतु एक महिन्यापूर्वी येथून जाणाऱ्या एका ट्रॅक्टरला रेल्वेने धडक दिल्याने त्या ट्रॅक्टरचे दोन तुकडे झाले. त्यावर कुठलीही उपाययोजना न करता रेल्वेने त्या ट्रॅक्टर मालकालाचं नोटीस पाठविली आणि पलिकडे जाण्याचा रस्ता पूर्णपणे बंद केला. रेल्वे फाटकाच्या दुसऱ्या बाजूने हजार ते दिड हजार एकर शेती असल्याने शेतकऱ्यांना पलीकडे शेतशिवारात जाण्यासाठी या शेतमार्गाशिवाय पर्याय नाही. करिता हा रेल्वेमार्ग ओलांडून जाणे भाग आहे. अशा वेळेला मागील दोन वर्षांपासून मागणी करूनही याठिकाणी ना फाटक बसविले ना अंडरपास बांधला. आणि आता ऐण मान्सूनच्या तोंडावर शेतीकडे जाणारा रस्ता रेल्वेने बंद केल्याने शेतकऱ्यांनी हा पवित्रा घेतला. आजच्या या आंदोलनामुळे शेतरस्त्याचे काम जेसीबीने पुर्ण करण्यात आले. तसेच येत्या काही दिवसांत अंडरपासचेही काम सूरू करण्याचे लेखी आश्वासन रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्यावर आम्ही आंदोलनाची सांगता करत आहोत. असेही ते म्हणाले.

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
१३ मे रोजी सकाळी चंद्रपूर तालुक्यातील साखरवाही येथील शेतपरिसरात स्थानिक शेतकरीबांधवांच्या रास्त मागण्या घेवून भाजपतर्फे रेल्वे प्रशासनाविरोधात रेल्वे रोको आंदोलन करण्यात आले.
साखरवाहीजवळील विमला सायडींग परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्या-येण्यासाठी पर्यायी एकचं रस्ता उपलब्ध होता, परंतु तो रस्ता मागील महिन्यात झालेल्या ट्रॅक्टर अपघातामुळे रेल्वेने बंद केला. त्यामुळे तो रस्ता तात्काळ सुरू करावा. या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात रेल्वे फाटक उभारून तेथे एका कर्मचाऱ्याची नेमणूक करावी. तसेच याठिकाणी कायमची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने विमला सायडींगजवळ आणि मुरसा शिव धुऱ्याजवळ असे दोन अंडरपास निर्माण करण्यात यावे. यासोबतच अपघाताने क्षतिग्रस्त झालेल्या ट्रॅक्टरच्या मालकाला नुकसान भरपाई देण्यात यावी. अशा महत्त्वपूर्ण मागण्यांना घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पुकारण्यात आले.
सकाळीच सुरू झालेल्या या आंदोलनास रेल्वे प्रशासनाने सुरुवातीला विरोध दर्शविला. परंतू शेतकऱ्यांनी विशेषत: महिलाभगिनींनी आक्रमक पवित्रा घेतल्याने रेल्वे प्रशासनाला नरमाईची भूमिका घेऊन सहकार्य करावे लागले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांचेशी चर्चा करून आंदोलनाच्या मागण्यांसंदर्भात अनुकुलता दाखवत रेल्वे प्रशासनाने तात्काळ जेसीबीच्या सहाय्याने बंद केलेला शेतमार्ग पूर्ववत केला. तसेच येत्या काही दिवसांत सक्षम अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन सदरहू अंडरपासच्या कामासंदर्भात उचित कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासनही त्यांनी आंदोलनकर्त्यांना दिले. यावेळी रेल्वे विभागाचे नागदेवते, आरपीएफचे कृष्णा रॉय, वासनिक, पाटील, मांजी यांसह अन्य रेल्वे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
या आंदोलनाला, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, महानगराध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, कामगार आघाडीचे प्रदेश महामंत्री अजय दुबे, माजी समाजकल्याण सभापती ब्रिजभूषण पाझारे, नकोड्याचे सरपंच किरण बांदूरकर, रूषी कोवे, विनोद खेवले, भारत रोहणे, माजी जि. प. सदस्य सुरेखा पाटील, रंजित सोयाम, महिला आघाडीच्या प्रिया ढवस, दुर्गा बावणे, . अनु ठेंगणे, संगीता डाहुले, ढुमणे, विनोद ढापणे, भाऊराव चार्लेकर, भाऊराव कुळमेथे, रामभाऊ कडुकर, बंडू ऊरकूडे, शुद्धोधन वानखेडे, मुबारक शेख, भीमराज आईलवार, युसुफ शेख, योगेश कडुकर, अजय चार्लेकर, सुशांत शर्मा, आशिष वाढई, राकेश बोमनवार, अमित निरंजने, पवन शेरकी, सुजय निर्मल, पियूष मेश्राम, आदिंसह मोठ्या संख्येने साखरवाही ग्रामस्थ व परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते